पालघर जिल्हा परिषद व त्याअंतर्गत येणाऱ्या
८ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणूका
निवडणूक कार्यक्रम

राज्य निवडणूक आयोग
महाराष्ट्र

सत्यमेव जयते

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

निवडणूक प्राथम्य

क्रमांक:-रानिआ/जिपपंस/२०१९/प्र.क्र. २९/का.७
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- १७ डिसेंबर, २०१९

प्रति,
जिल्हाधिकारी,
पालघर

विषय :- पालघर जिल्हा व त्याअंतर्गत ८ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणूकीचा कार्यक्रम

संदर्भ :- १) राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ/जिपपंस-२०१९/प्र.क्र.२९/का.७, दिनांक ०२/१२/२०१९
२) राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ/जिपपंस-२०१९/प्र.क्र.२९/का.७, दिनांक ०५/१२/२०१९

महोदय,

राज्य निवडणूक आयोगाच्या उपरोक्त संदर्भांकित अ.क्र. १ समोरील दि. ०२/१२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये पालघर जिल्हा परिषद व त्याअंतर्गत येणाऱ्या ८ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदार यादी तयार करण्याचा कार्यक्रम देण्यात आला असून दि. १६/१२/२०१९ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिध्द करण्यात आली आहे.

२. आता या पत्रासोबत जोडलेल्या परिशिष्ट -२ मध्ये नमूद करण्यात आलेल्या पालघर जिल्हा परिषद व त्याअंतर्गत येणाऱ्या ०८ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी परिशिष्ट-१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात येत आहे.

३. उक्त पालघर जिल्हा परिषद व त्याअंतर्गत येणाऱ्या ८ पंचायत समित्यांचा निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्यापासून निवडणूकीचा निकाल जाहीर होईपर्यंत उक्त निवडणूक विभाग / निर्वाचक गणाच्या क्षेत्रात आचारसंहिता लागू राहील. पालघर जिल्हा परिषद व त्याअंतर्गत

येणाऱ्या पंचायत समित्यांमधील मतदारांवर प्रभाव पडेल, अशा तऱ्हेचे कोणतेही धोरणात्मक निर्णय, कोणतीही कृती/घोषणा संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था, खासदार, आमदार किंवा इतर कोणत्याही पदाधिकाऱ्यांना करता येणार नाही.

४. उपरोक्त पालघर जिल्हा परिषद व त्याअंतर्गत येणाऱ्या ८ पंचायत समित्यांमधील निवडणूकीसंदर्भात कोणत्याही न्यायालयात याचिका दाखल असल्यास त्याबाबत खातरजमा करुन न्यायालयाच्या आदेशानुसार आवश्यक कार्यवाही करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील. तसेच मा. न्यायालयाचे कोणत्याही रिट याचिकामध्ये स्थगिती आदेश असल्यास/प्राप्त झाल्यास निवडणूक कार्यक्रम स्थगित करण्यात यावा व तसे आयोगास अवगत करावे.

५. माहे फेब्रुवारी,२०१७ मध्ये घेण्यात आलेल्या जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्यावेळी निवडणुकीच्या पुर्वतयारीबाबत राज्य निवडणूक आयोगाने संदर्भांकित दि. २ जानेवारी,२०१७ च्या पत्रान्वये सविस्तर सूचना दिल्या असून संदर्भांकित अ.क्र.२ समोरील दि.०५/१२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये कार्यवाही करण्याबाबत आपणांस निदेश दिले आहेत. तरी सदर सूचनांनुसार पालघर जिल्हा परिषद व त्याअंतर्गत येणाऱ्या ०८ पंचायत समित्यांच्या निवडणुकीमध्ये कार्यवाही केली जाईल याची दक्षता घेण्यात यावी.

६. सदरचा निवडणूक कार्यक्रम आयोगाच्या https://mahasec.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांचे आदेशानुसार,

आपला,

(किरण कुरुंदकर)
सचिव
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

सहपत्र-परिशिष्ट-१ व २

प्रत :-

१. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
२. अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

३. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव सर्व मंत्रालयीन विभाग
४. प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग,बांधकाम इमारत, मर्झबान पथ, मंत्रालय, मुंबई-१
५. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
६. विभागीय आयुक्त, कोकण
७. जिल्हा पोलिस अधिक्षक, पालघर
८. संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय, चर्नीरोड, मुंबई-४
९. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर
१०. महिती जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
११. राज्य निवडणूक आयोगाचे मा. मुंबई उच्च न्यायालय, मुंबई येथील वकील
१२. संगणकीकरण कक्ष, राज्य निवडणूक आयोग यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
१३. राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने
१४. निवड नस्ती (कार्यासन-७), राज्य निवडणूक आयोग

राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक-
रानिआ/ जिपपंस/२०१९/प्र.क्र.२९/का.७,
दिनांक १७ डिसेंबर, २०१९ सोबतचे

परिशिष्ट-१

## पालघर जिल्हा परिषद व त्याअंतर्गत येणाऱ्या ८ पंचायत समित्यांमधील सार्वत्रिक निवडणुकांचा कार्यक्रम

| अ.क्र. | टप्पे | कार्यक्रमांचा दिनांक |
|---|---|---|
| १ | निवडणुकीच्या तारखांची सूचना व निवडणुकीचा कार्यक्रम जिल्हाधिकाऱ्यांनी प्रसिध्द करण्याची तारीख | बुधवार, १८ डिसेंबर, २०१९ |
| २ | संकेतस्थळावर भरण्यात आलेले नामनिर्देशनपत्र निर्वाचन अधिकाऱ्यांनी स्विकारण्याचा कालावधी | बुधवार, १८ डिसेंबर, २०१९ (सकाळी ११ ते दु.३ पर्यंत) ते सोमवार २३ डिसेंबर, २०१९ (रविवार दि.२२/१२/२०१९ रोजी सार्व. सुट्टी असल्याने नामनिर्देशनपत्र स्विकारण्यात येणार नाहीत.) |
| ३ | नामनिर्देशनपत्राची छाननी व त्यावर निर्णय देणे | मंगळवार, २४ डिसेंबर, २०१९ (सकाळी ११ वाजल्यापासून) |
| ४ | वैध उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | मंगळवार, २४ डिसेंबर, २०१९ ( छाननीनंतर लगेचच ) |
| ५ | नामनिर्देशनपत्राचा स्विकार करण्याबाबत किंवा ते नामंजूर करण्याबाबतचा निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने दिलेल्या निर्णयाविरुध्द जिल्हा न्यायाधिशांकडे अपिल करण्याची शेवटची तारीख | शुक्रवार, २७ डिसेंबर,२०१९ |
| ६ | जिल्हा न्यायाधिशांनी अपिलावर सुनावणी व निकाल देण्याची संभाव्य शेवटची तारीख | सोमवार, ३० डिसेंबर, २०१९ |
| ७ | जिल्हा न्यायाधिशांनी अपिल निकालात काढल्यावर वैध उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे | सोमवार, ३० डिसेंबर, २०१९ |
| ८ | उमेदवारी मागे घेणे<br>(अ) जेथे अपील नाही तेथे | सोमवार, ३० डिसेंबर, २०१९ (सकाळी ११ ते दु.३ पर्यंत) |
| | (ब) जेथे अपील आहे तेथे | बुधवार, ०१ जानेवारी, २०२० (सकाळी ११ ते दु.३ पर्यंत) |
| ९ | निवडणूका लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे व निशाणी वाटप-<br>(अ जेथे अपील नाही तेथे | सोमवार, ३० डिसेंबर, २०१९ ( दुपारी ३.३० नंतर) |
| | (ब) जेथे अपिल आहे तेथे | बुधवार, ०१ जानेवारी, २०२० ( दुपारी ३.३० नंतर) |

| | | |
|---|---|---|
| १० | मतदानाची तारीख | मंगळवार, ०७ जानेवारी,२०२०<br>(सकाळी ७.३० ते ५.३० पर्यंत) |
| ११ | मतमोजणी तारीख | बुधवार, ०८ जानेवारी,२०२०<br>(सकाळी १०.०० पासून) |
| १२ | निवडून आलेल्या सदस्यांची नावे प्रसिध्द करणे | शुक्रवार, १० जानेवारी,२०२० पर्यंत |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

( किरण कुरुंदकर )
सचिव
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक-रानिआ/जिपपंस-२०१९/प्र.क्र.२९/का.७, दि. १७ डिसेंबर, २०१९

परिशिष्ट-२

| अ.क्र. | जिल्हा | पंचायत समितीचे नांव |
|---|---|---|
| १ | पालघर | १) तलासरी |
| | | २) डहाणू |
| | | ३) विक्रमगड |
| | | ४) जव्हार |
| | | ५) मोखाडा |
| | | ६) वाडा |
| | | ७) पालघर |
| | | ८) वसई |